अवयवदान - एक महाचळवळ

विद्यार्थ्याचे नाव - यश योगेश सिसोदे.
महाविद्यालयाचे नाव - म.वि.प्र. डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय. अडगाव. नाशिक.
अभ्यासक्रम - MBBS (2nd)
शैक्षणिक वर्ष - द्वितीय वर्ष
भ्रमणध्वनी क्रमांक - 7507629157
स्वाक्षरी व दिनांक - Ysode 26/8/20

दानेन प्राप्यते स्वर्गो दानेन सुखमश्नुते ।
इहामुत्र च दानेन पुज्यो भवति मानवः ॥

आपल्या संस्कृतीत दानाची संकल्पणा फार सुंदर मांडण्यात आलेली आहे. परमार्थाचे परमोच्च साधन म्हणजे दान. दान केल्याने स्वर्ग प्राप्त होतो. दानानेच सुख मिळते. या लोकात व परलोकात मनुष्य दानानेच पूज्य होतो. असे दान करतांना कोणताही स्वार्थ आडवा येऊ नये. अशी भावना आहे. तन, मन आणि धन यांपैकी धनाचा त्याग हा त्या तुलनेत सर्वांत सहज करण्यासारखा आहे. कालानुरूप दानाच्या परिभाषेत बदल होत गेला. विज्ञानयुगात देहदान, अवयवदान, रक्तदान यांना महत्व आले आहे.

एखाद्या जिवंत अथवा मृत मानवी शरीरातील अवयव वा टिशूज (tissues) त्या शरीरातून काढून दुसऱ्या मानवी शरीरात त्यांचे प्रत्यारोपण करणे म्हणजे अवयवदान. जागतिक पातळीवर अवयवदानाकरता स्वसंमतीच्या 'ऑप्ट इन' आणि 'ऑप्ट आऊट' या दोन पद्धती आहेत. ऑप्ट इन पद्धतीत ज्या दात्यांनी बास फॉर्म भरून आपली संमती जाहीर केली असेल अशांनाच दाते समजण्यात येते. तर ऑप्ट आऊट पद्धतीत 'अवयवदान करायचे नाही' असा नकार दिला नसलेल्या उर्वरीत

Scanned by CamScanner

सगळ्यांना ते दाते आहेत असं गृहीत धरल जातं. भारतात 'ऑप्ट-इन' ही पध्दत अवलंबली जाते.

ऑप्ट-आऊट पध्दतीचा स्वीकार केल्यास दात्यांची संख्या लक्षणीयरित्या वाढते. उदा. जर्मनीसारख्या देशात ऑप्ट इन पध्दत आहे. तेथे एकूण लोकसंख्येच्या 12% दाते आहेत तर त्यांच्या शेजारच्या ऑस्ट्रियामध्ये आर्थिक आणि सांस्कृतिक साम्य असलं तरी केवळ ऑप्ट आऊट पध्दत स्विकारल्यामुळे एकूण लोकसंख्येच्या ९९.९८% दाते आहेत.

इतर देशांच्या तुलनेत भारतात ही संकल्पना अजून सहजासहजी स्विकारली गेली नाहीये. यामागे धार्मिक, सांस्कृतिक, अज्ञानामुळे पुरेशी सजगता नसणे, अंधश्रध्दा असे अनेक घटक असू शकतात. अवयव दान केल्यानंतर पुनर्जन्म मिळत नाही, मिळाला तरी जो अवयव दान केला त्याच्याशिवाय मिळतो किंवा अवयवदान केले तर स्वर्गात प्रवेश मिळत नाही अशा प्रकारच्या समजुती जशा हिंदू समाजात आहेत, तशाच इतर समाजातही आहेत. उदा. मुस्लीम समाजात अशी समजुत आहे की एखादी व्यक्ती मृत झाल्यावर ज्या स्थितीत दफन होते, त्याच स्थितीत ती पुन्हा पृथ्वीवर जन्म घेते, त्यामुळे तिचा एखादा अवयव नसेल तर ती तशीच जिवंत होणार असे सोशल टॅब्यू हीच याबाबतीतली सगळ्यात मोठी अडचण आहे.

भारतामध्ये अवयवदानाचे प्रमाण अल्प आहे. आपल्याकडे दशलक्ष लोकसंख्येमागे 0.05 ते 0.08 टक्के पर्यंत अवयव दानाचा दर आहे. अवयवदानाविषयी जागृती करण्यासाठी 13 ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय अवयवदान दिन म्हणून पाळला जातो. या दिवशी भारतामध्ये विविध कार्यक्रमांमधून अवयवदानाविषयी जनजागृती केली जाते.

• अवयवदात्याबद्दल महत्वाचे

अवयव प्रत्यारोपण हा एखादया अवयवाला झालेल्या रोगाच्या शेवटच्या टप्प्यावरील उपाय मानला जातो. जी व्यक्ती अवयवदान करते, त्याला दाता आणि ज्या रुग्णाला तो अवयव प्रत्यारोपित करण्यात येतो त्याला प्राप्तकर्ता म्हणतात. दाता आणि प्राप्तकर्ता एकाच ठिकाणी असू शकतात किंवा अवयवांचे

Scanned by CamScanner

दात्याच्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थानांतर केले जाऊ शकते. यशस्वीपणे स्थलांतरीत केलेल्या अवयवांमध्ये हृदय, मुत्रपिंड, यकृत, फुफ्फुसे, स्वादुपिंड, आतडे आणि थायमस यांचा समावेश होतो. ऊतकांमध्ये हाडे, टेंडन्स, कार्निया, त्वचा, हृदयाच्या झडपा आणि शिरा यांचा समावेश होतो. सामान्यपणे जगभरात मूत्रपिंड जास्त प्रमाणात प्रत्यारोपित केले जातात. त्यानंतर यकृत व हृदयाचा क्रम लागतो.

• कायदेशीर बाबींची पूर्तता गरजेची

हृदयाचा ठोका बंद होण्याआधी 24 तासांपर्यंत संसर्गजन्य मृत्यू तसेच ब्रेनडेड / मस्तिष्कचा मृत्यू झाल्यास दात्यांकडून ऊतक व इतर अवयव पुनप्राप्त केले जाऊ शकतात. बऱ्याच वेळा अवयव व बहुतेक ऊतक (कॉर्निया वगळता) पाच वर्षांपर्यंत संग्रहित केले जातात. जेव्हा एखादी व्यक्ती मरण पावते, तेव्हा तिच्या वैद्यकीय इतिहासावर आणि वयानुसार दात्याच्या उपयुक्ततेसाठी त्याचे मुल्यांकन केले जाते. अवयव प्रत्यारोपण करण्याआधी कायदेशीर बाबींची पूर्तता करणे आवश्यक असते. दाता हा वैद्यकीय दृष्ट्या मेंदूमृत असला पाहीजे आणि दात्याच्या नातेवाइकांनी अवयव प्रत्यारोपणाला परवानगी देणे आवश्यक आहे.

• प्रत्यारोपणासाठी महत्वाचे

- प्रत्यारोपणाआधी रुग्णांची इत्यंभूत माहिती घेणे आवश्यक व बंधनकारक असते.
- प्रत्यारोपणाची पात्रता निश्चित करण्यासाठी रुग्णाचे मुल्यमापण केले जाते. त्यात विविध चाचण्यांचा समावेश असतो.
- रुग्णाचा रक्तगट, वय, रुग्णाची आर्थिक, मानसिक व शारिरिक स्थिती, विविध आजार, मधुमेह, रक्तदाब, शस्त्रक्रिया सहन करण्याची क्षमता इत्यादी बाबींचा विचार केला जातो.

• रुग्णांनी नोंदणी करणे आवश्यक

ज्या रुग्णांना अवयवांची गरज असते, त्यांना प्रथम त्या प्रदेशातील प्रत्यारोपण संस्थेकडे म्हणजेच झोनल ट्रान्सप्लांट

Scanned by CamScanner

कोऑर्डिनेशन सेंटर (जेडीटीसीसी) कडे ठराविक शुल्क भरून नोंदणी करावी लागते. यासाठी रुग्णालयातील प्रत्यारोपण केंद्राची मदत घेतली जाते. नोंदणी केल्यावर त्या रुग्णाचे नाव प्रतीक्षा यादीमध्ये समाविष्ट केले जाते. या प्रतीक्षाकालात रुग्णांना त्या रोगावरील औषधे देऊन स्थिर, सुरक्षित व सुस्थितीत ठेवले जाते. रुग्णाला दात्याकडून अवयव मिळेपर्यंत तणाव व चिंतेचा सामना करावा लागतो. हा काळ दोन आठवड्यापासून ते दोन वर्षांपर्यंतचा असू शकतो. प्रतीक्षा यादी ही खास नियुक्त केलेल्या मध्य प्रत्यारोपण समन्वयकांद्वारे संचालित आणि अद्यावत केली जाते.

• प्रत्यारोपण प्रक्रिया

एखाद्या रुग्णाला मेंदूमृत घोषित केल्यानंतर त्याच्या नातेवाइकांचे प्रत्यारोपण करण्यासंदर्भात समुपदेशन केले जाते. बऱ्याच वेळा नातेवाइकांना अवयवदानाविषयी पुरेशी माहिती नसते. त्यामुळे त्यांना तयार करण्याची जबाबदारी प्रत्यारोपण समुपदेशकांची असते. नातेवाइक तयार झाल्यानंतर, त्या रुग्णाची माहिती जेडीटीसीसी ला कळवली जाते. जेडीटीसीसी ही माहीती त्या विभागातील प्रत्यारोपण केंद्रांना कळवते. त्यानंतर त्या ठिकाणी जाऊन डॉक्टरांच्या मदतीने त्या रुग्णातील आवश्यक अवयव वेगळे केले जातात. अनेक बाबींचा विचार करून अवयव प्रत्यारोपणासाठी प्राप्तकर्त्याशी जुळवले जातात. त्यामध्ये रक्तगट, अवयवाचा प्रकार व आकार, त्वरित गरजवंत रुग्ण, प्रतिक्षा यादीमधील संख्या, दाता आणि प्राप्तकर्ता यामधील अंतर यांचा समावेश होतो. जर प्राप्तकर्ता आणि दाता यातील अंतर दूर असेल तर 'ग्रीन कॉरिडॉर'च्या मदतीने अवयव स्थलांतरीत केले जातात.

सध्या नावीन्यपुर्ण तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मानवी अवयव प्रत्यारोपणाद्वारे विविध गंभीर आजारांवर उपचार साध्य होत आहेत. आपल्या देशात अवयव न मिळाल्यामुळे रुग्ण दगावण्याचे प्रमाण मोठे आहे. यकृत प्रत्यारोपण, मूत्रपिंड प्रत्यारोपण होण्यासाठी प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांची संख्याही मोठी आहे. सध्यस्थितीला महाराष्ट्र राज्यात किडणी (5,757) यकृत (1,137) हृदय (73) फुफ्फुस (14) तर स्वादुपींडासाठी (45) एवढे नोंदणीकृत रुग्ण

Scanned by CamScanner

अवयव मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत

कोरोना काळात नॉन-कोव्हिड रुग्णांची जशी सरोहोलपट झाली तशीच अवयवांच्या प्रतिक्षेत असणाऱ्याचीही झाली कारण कोरोणाचा संसर्ग सुरू झाल्यापासून अगदी हाताच्या बोटावर मोजता येईल एवढेच अवयवदान झाले आहे. दरम्यान सध्या कोरोना काळ असुनही मुंबई अवयवदान प्रत्यारोपण समितीकडून विशेष काळजी घेतली जात आहे. टिकठीकाणी अशा समिती अवयवदानासाठी आपली नियमावली तयार करत आहेत. त्यानुसार अवयवदात्यांची चाचणी केली जाते. त्यांच्या कुटुंबीयांची देखील कोरोना चाचणी केली जाते. सर्व घटकांना लक्षात घेऊन ती व्यक्ती अवयवदानासाठी योग्य की अयोग्य हे समिती ठरवते. मानवी अवयवांची व्यावसायिक विक्री होऊ नये याकरिता केंद्र शासनाने 'मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा 1994 लागू केला असुन त्यामध्ये सुलभता आणण्याकरीता सन 2011 मध्ये सुधारणा करून नातेवाईकांची कार्यकक्षा वाढविण्यात आली आहे

आज अवयवदान एक चळवळ म्हणून उभी राहत आहे. लोकांना अवयवदानाचे महत्व कळू लागले आहे. आपले बदलते जीवनचक्र पाहता, त्याचबरोबर निसर्ग, पर्यावरणातील बदल, आहारातील चटपटीत, तेलकट खाद्य पदार्थ, व्यायमाचा अभाव, जंक फुडचे आकर्षण यामुळे शरिरामध्ये अनेक व्याधी निर्माण होत आहेत. तरूण वयात अनेक अवयव निकामी होत आहेत. मधुमेह, रक्तदाब, हृदयविकार, किडनी आजार, यकृतात बिघाड आशा तक्रारी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. बऱ्याचदा आजाराचे उशीरा निदान होणे, उपचाराची माहिती नसणे, डॉक्टरांची सोय नसणे, आर्थिक अडचणी यामुळे रुग्ण दगावतात म्हणूनच वेळीच निदान झाले तर अवयव प्रत्यारोपण करून आपले आयुष्य आपण सुखाने, आनंदाने अधिक काळ जगू शकतो व दुसऱ्या बाजूला अवयवदान करून मृत्यूनंतर कुणाचेतरी जीवन फुलवू शकतो

आपण ज्या समाजात राहतो, त्या समाजाचे ऋण हे जिवंतपणे फेडण्याबरोबरच मृत्यूनंतरही फेडता येऊ शकते ही जाणीव प्रत्येकाच्या मनात निर्माण व्हावयास हवी. ज्या व्यक्तीचे निधन होते, तिच्या आप्त-स्वकियांमध्ये- दुःखाची भावना तीव्र

Scanned by CamScanner

असते. अशा शोकाकुल कुटुंबियांमध्ये एखादा जागरूक नातेवाईक असेल तरच तो नेत्रदान अथवा अवयवदानाबाबत पुढाकार घेऊ शकतो. अन्यथा मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केलेल्या व्यक्तींचेही नेत्रदान होत नाही.

लोक असाही विचार करतात की आधीच आमचा माणूस आमच्यापासून दुरावला गेला आहे त्यात त्याच्या शरीराचा भाग काढून त्याची आणखीच दुर्दशा का करावी ?

आपण कोणत्या गोष्टीचा कितपत भावनिकदृष्ट्या विचार करायचा हे आपल्यावर आहे. भावनिक गोष्टींना बळी न पडता जर अवयवदान केले तर एखादयाचे प्राण वाचू शकतात. त्याचा पुनर्जन्म होऊ शकतो. अवयवदानाचा अर्ज भरून प्रत्येकानं आपल राष्ट्रीय कर्तव्य आणि माणुसकीच दर्शन घडवायला हवं. अवयवदान हा संवेदनशील आणि महत्वाचा विषय असल्याने याबाबत वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत व्यक्तींनी पुढाकार घ्यायला हवा, म्हणजे "आधी केले, मग सांगितले" ही उक्ती सार्थ ठरेल.

Scanned by CamScanner